**आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्र विकास/ मुलभूत सुविधांच्या योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना...**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : टिएसपी-२००६/प्र.क्र.४१/का.६**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ९ जानेवारी, २००७.**

**वाचा :-** (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक आउयो-१०९१/प्र.क्र.११/का.६, दिनांक २१ सप्टेंबर, १९९२.
(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टिएसपी-१०९३/प्र.क्र.७७/का.६, दिनांक २४ जानेवारी, १९९४.
(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का.६, दिनांक २६जुलै, २००४.
(४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का.६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५

**प्रस्तावना :-** उपरोक्त संदर्भात नमूद केलेल्या अ.क्र. (३) येथील दिनांक २६.७.२००४ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्र विकास/ मुलभूत सुविधांच्या योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. काही लेखाशीर्षाखालील योजना राबवितांना आदिवासी भागातील उपरोक्त दि. २६.७.०४ च्या शासन निर्णयांन्वये घालण्यात आलेले अटी व आदिवासी लोकसंख्येची बंधने आड येत असल्याचे लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले होते. त्यामुळे लोकसंख्या व लघुपाटबंधाऱ्यांच्या बाबतीत लाभार्थी व लाभक्षेत्राची अट शिथील करण्याबाबतच्या तरतूदी दि. १० नोव्हेंबर, २००५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय योजनांसाठी आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध झालेल्या नियतव्ययाच्या ७० टक्के व राज्यस्तरीय योजनांसाठी ३० टक्के नियतव्यय राखून ठेवण्याची तरतूद उपरोक्त शासन निर्णयान्वये करण्यात आली होती. तथापि उपरोक्त दोन्हीही शासन निर्णयामध्ये मध्यम व मोठया पाटबंधारे प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली नव्हती. सदर शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी मध्यम व मोठया पाटबंधारे प्रकल्पासाठी आदिवासी उपयोजनेतून निधी उपलब्ध करुन दिला जात असे.

२. आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या नियतव्ययाचे जिल्हास्तरीय योजना व राज्यस्तरीय योजना यामध्ये वाटप सुधारीत टक्केवारी नुसार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचपमाणे मध्यम प्रकल्पासाठी निधी उपलबध करुन देणे शक्य व्हावे, याकरिता दि. १० नोव्हेंबर, २००५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ व २ मध्ये पुढीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे.

(१) आदिवासी उपयोजनेला उपलब्ध झालेल्या व्ययापैकी ६०% व्यय जिल्हा [illegible] योजनांसाठी व ४०% व्यय राज्यस्तरीय योजनांसाठी राखून ठेवण्यात यावा.

३. त्याचप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद २ (६) नंतर खालील परिच्छेदाचा परिच्छेद (७) म्हणून समावेश करण्यात यावा :-

(७) आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये घ्यावयाच्या मध्यम प्रकल्पासाठी दि. १०.११.२००५ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून तसेच प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी आदिवासी विकास विभागाची सहमती ज्या प्रकल्पासाठी घेतली आहे, अशा मध्यम पाटबंधारे प्रकल्पांना विशेष बाब म्हणून निधीच्या उपलब्धतेनुसार व लोकसंख्येच्या अधिक्याच्या क्रमानुसारच निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कृ. मा. पवार )
सह सचिव,
आदिवासी विकास विभाग.

प्रति,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
नियोजन विभाग,
पाटबंधारे विभाग,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शालेय शिक्षण विभाग,
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रिडा व युवक सेवा विभाग,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा),
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
कृषि व पदुम विभाग,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महिला व बालकल्याण विभाग,
उर्वरित सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
कृषि आयुक्त, पुणे.
आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे.
आयुक्त, मत्स्यव्यवसाय विकास, मुंबई.
आयुक्त,एकात्मिक बालविकास कार्यक्रम,नवी मुंबई
अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, ठाणे/नाशिक/पुणे/अमरावती/अहमदनगर/चंद्रपूर/नांदेड/नागपूर / यवतमाळ / अकोला.

अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग (स्था.स्त.), ठाणे/नाशिक/औरंगाबाद/पुणे/नागपूर/अमरावती
अधिक्षक अभियंता, तापी पाटबंधारे महामंडळ,
अधिक्षक अभियंता, विदर्भ पाटबंधारे महामंडळ,
अधिक्षक अभियंता, गोदावरी पाटबंधारे महामंडळ,
अधिक्षक अभियंता, कृष्णा पाटबंधारे महामंडळ,
संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक),पुणे.
संचालक, क्री डा, पुणे.
अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,ठाणे/नवी मुंबई/पुणे/अहमदनगर/धुळे/नांदेड/
अमरावती /चंद्रपुर/नागपूर/यवतमाळ/जळगांव
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवीमुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण, मुंबई.
महासंचालक, आरोग्य, मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे.
सहसंचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व आदिवासी व माडाक्षेत्र जिल्हे)
सर्व जिल्हा शल्य चिकीत्सक (सर्व आदिवासी व माडाक्षेत्र जिल्हे)
संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण, मुंबई.
अपर आयुक्त,आ.वि.ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद
इतर मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुख.
सह/उप सचिव,आ.वि.वि.
सर्व कार्यासने,आ.वि.वि.
सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
निवड नस्ती,का.६,आ.वि.वि.